**केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटासोबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.९४ /इमा-२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. २७/११/२०२०.

**संदर्भ :-** १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०/ प्र.क्र.१०० /२०२०/व्यय-१२ दि. २९/०७/२०२०.
२) वित्त विभाग शासन पूरक पत्र क्र. संकीर्ण १०२०/ प्र.क्र.१०० /२०२०/व्यय-१२ दि. १४/१०/२०२०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने वित्त विभागामार्फत संदर्भ क्र. १ व संदर्भ क्र. २ अन्वये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटासोबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणी संदर्भात उपाययोजना व सहाय्य करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

संदर्भाधीन शासन परिपत्रक १ मधील परिच्छेद ८ नुसार सदर मार्गदर्शक सूचना या राज्य शासनाच्या विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या सर्व प्रकल्प व कामांच्या कंत्राटांना लागू आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विविध कामे ब-१ / ब-२ / क / Hybrid Annuity / Asian Development Bank / EPC निविदा प्रगतीपथावर आहेत. आता वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रका नुसार देण्यात आलेल्या सूचना या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीपथावर असलेल्या Hybrid Annuity व Asian Development Bank सह सर्व कामांना दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत लागू राहतील. दि. २९ जुलै, २०२० च्या शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ८ अन्वये प्रकल्प अंमलबजावणीचे अधिकार प्रशासकीय विभागांनी प्रदान करावयाचे आहेत. त्यास अनुसरून Hybrid Annuity व Asian Development Bank च्या प्रकल्पाबाबत मुदतवाढीचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच ब-१ / ब-२ / क निविदेसाठी प्रकल्पाचे मुदतवाढीचे मुख्य अभियंता यांचे अधिकार अधीक्षक अभियंता यांना प्रदान करण्यात येत आहे. यास्तव संदर्भाधीन वित्त विभागाच्या परिपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने मुदतवाढ व सुरक्षा ठेव अनामत रकमेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२०११२७१२५९५५३७१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=643026ceca9d6dc21fa6c4525f6fd9fbdfc59a9a42af9ca3066f28a4b58ad630, cn=SACHIN MANIKRAO CHIVATE
Date: 2020.11.27 13:02:23 +05'30'

**( सचिन चिवटे )**
अवर सचिव (इमारती), महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग व (विद्युत) विभाग
२. सर्व अधिक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळ व (विद्युत) मंडळ,
३. निवडनस्ती (इमारती-२).